


NBT INDIA

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

₹ 25.00
ISBN 812370321-X
12131715

# प्रेमचंद

अमृत राय
अनुवाद : भा. रा. भागवत



*नेहरू बाल पुस्तकालय*

# प्रेमचंद

**अमृत राय**

अनुवाद

**भा. रा. भागवत**

चित्रे

**सिद्धार्थ बॅनर्जी**



एकः सूते सकलम्
NBT INDIA

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

छायाचित्रे : लेखकाच्या सौजन्याने

ISBN 978-81-237-0321-3

प्रथम प्रकाशन : 1983 *(शके 1905)*
पाचवी आवृत्ती : 2005 *(शके 1927)*
सहावी आवृत्ती : 2009 *(शके 1931)*
सातवी आवृत्ती : 2012 *(शके 1934)*
आठवी आवृत्ती : 2013 *(शके 1934)*

मूळ © अमृत राय, 1978
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

Premchand *(Marathi)*

**₹ 25.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया
वसंत कुंज, फेज-II, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

# एक

चंद्रहासन् खूप दूरच्या केरळ प्रांतातला युवक. तिथून तो आता बनारसला आला आहे – प्रेमचंदांना भेटायला. बरीच दारे ठोठावून झाल्यावर तो या प्रख्यात लेखकाच्या घराशी येऊन पोचतो. आपण आलो आहोत हे जाहीर करण्यासाठी जरूर ते सगळे आवाज काढतो. पण उत्तर नाही! तेव्हा स्वारी जवळच्या दारापाशी जाते आणि जरा भीत भीत आत डोकावते. आत बसला आहे एक लंब्या झुपकेदार मिशांचा माणूस. जमिनीवरच. पुढ्यात एक लहानसे डेस्क. त्याच्यावर लिहिण्यात गढलेला. खोली भयंकर उघडीवागडी. माणूस अगदी साधा. आमच्या या लहान पाहुण्याला खात्रीपूर्वक वाटते की हा त्या महान लेखकाचा लेखनिक असावा.

चंद्रहासन् पुढे होऊन म्हणतो, "मला मुन्शी प्रेमचंदांना भेटायचंय." प्रेमचंद वर बघतात. त्यांना गंमत वाटलेली दिसते. लेखणी खाली ठेवून ते खदखदून हसतात; आणि म्हणतात, "वा-छान! ... पण आधी खाली बसतोस ना?"

नाशाद–एकतरुण उर्दू कवी. प्रेमचंदांचे पहिले दर्शन घ्यायला म्हणून लखनौत त्यांच्या घरी जातो. घराचे ठावठिकाण त्याला साधारण माहीत असते; पण सापडेल अशी खात्री नाही, म्हणून मग रस्त्यात कुणालातरी विचारतो. या माणसाचा अवतार जरा गबाळाच. अंगात नुसती कोपरी, फारसे स्वच्छ नसलेले धोतर.

"मला प्रेमचंदांचं घर दाखवता का हो?"

"जरूर दाखवतो." तो माणूस म्हणतो.

तो पुढे चालतो. मागून हा तरुण कवी. लवकरच दोघे घरापाशी पोचतात. जिना चढून जातात. माडीवर एका खोलीत शिरतात. खोली तशी उघडीवागडीच. तो माणूस नाशादला जरा थांबायला सांगतो. घराच्या आतल्या भागात जातो. थोड्याच वेळात पुन्हा बाहेर येतो. आता त्याने कोपरीवरून सदरा घातलेला असतो.

मिस्किलपणे हसत तो म्हणतो, "हे आहेत मुन्शी प्रेमचंद!"

एप्रिल 1934. दिल्लीत हिंदी साहित्यिकांची परिषद भरली आहे. ललित विभागाचे अध्यक्ष म्हणून प्रेमचंदांची नेमणूक झालेली आहे. कीर्तीच्या शिखरावर आहेत ते सध्या. पण म्हणून परिषदवाल्या मंडळींकडून त्यांनी स्वतःसाठी काही खास मागितले आहे असे मुळीच नाही. सुप्रसिद्ध हिंदी कादंबरीकार जैनेंद्रकुमार यांच्या शब्दांत सांगायचे तर "ते आले, राहिले इतर चारचौघांसारखे. निजायच्या दालनात इतर पाचपन्नास जण जसे झोपले होते तसेच तेही एका साध्या कॅंप-कॉटवर झोपले." एखाद्या इस्पितळाच्या जनरल वॉर्डसारखी दिसते आहे ती खोली. पण प्रेमचंदांची तक्रार काही नाही. त्यांना हेच बरे वाटत असावे. जेवणाची वेळ झाली की कॅंटिनमध्ये जातात, जेवण मागतात. तिथला स्वयंसेवक विचारतो, "तुमचं भोजन तिकीट?"

"तिकीट असतं? कुठं मिळतं ते?"

"त्या खिडकीपाशी - म्हणजे विकत हवं असेल तर. नाहीतर कार्यालयातून आणा." आपण कुणाशी बोलतो आहे हे त्याला माहीतही नसते.

एक शब्द न बोलता प्रेमचंद खिडकीकडे जातात, रांगेत उभे राहतात. आपले तिकीट विकत घेतात.

असाच माणूस. स्वभावाने अगदी साधा.

आता आणखी एक दृश्य. लाहोर : सन 1935. उर्दूतले नामांकित कवी इम्तियाज अली यांनी त्यांना चहाला बोलावले आहे. "ठीक आहे. येईन. पण आधी बरंच काही करायचं आहे." आणि मग दिवसभर लाहोरच्या रस्त्यातून धावपळ करून आपला गद्य कार्यक्रम उरकून ते जेव्हा संध्याकाळी, विस्कटलेले धोतर नि जाडाभरडा सदरा अशा आपल्या अवतारात कविराजांच्या घरापाशी येतात तेव्हा त्यांना दिसते शंभरावर मोटारींची रांग-एकीहून एक अशा आलिशान गाड्या. न्यायाधीश, बॅरिस्टर, डॉक्टर, प्राध्यापक, अशांच्या गाड्या. शहरातल्या एकूणएक प्रतिष्ठितांना निमंत्रणे गेलेली. प्रेमचंदांची नीट माहिती नसलेल्या या बड्या लोकांना जेव्हा कळले, की आपण ज्यांची वाट पाहत होतो ते प्रेमचंद हेच, तेव्हा त्यांना धक्काच बसला—काय म्हणता? अस्ताव्यस्त पोशाखातली, गावंढळ वाटणारी विनोदमूर्ती म्हणजेच का प्रेमचंद?

अशा त्यांच्या कितीतरी गोष्टी आहेत. त्यावरून एकच सूर निघतो. माणूस अत्यंत साधा. बरकरणी दाखवण्यासाठी घेतलेले असे काही नाही. जसा आहे तसा दिसतो. त्यांना मनापासून तिटकारा कसला असेल तर तो देखाव्याचा.





प्रेमचंद – 1907

## दोन

प्रेमचंद आपल्या स्वतःबद्दल म्हणतात :

"माझं जीवन म्हणजे एक सपाट मैदान आहे. त्यात मधूनमधून काही खळगे असतील. पण कडेकपारी, डोंगर-टेकड्या, खोल दऱ्या किंवा पडीक अवशेष - असलं काही नाही. गिर्यारोहणाची ज्यांना आवड असेल त्यांना इथे काही मिळायचं नाही.

"31 जुलै 1880 रोजी मी जन्मलो लमही नावाच्या खेड्यात. बनारसपासून चार मैलांवरचं ते एक खेडं. माझे वडील पोस्टात होते. आई रुग्णाईत. मला एक मोठी बहीण पण होती. माझ्या जन्माच्या वेळी वडिलांना एकवीस रुपये पगार होता. ते वारले तेव्हा तो चाळीसपर्यंत वाढला होता. स्वभावाने फार चिंतनशील होते ते. आयुष्याची वाटचाल त्यांनी डोळे सताड उघडे ठेवून केली. आणि तरी अखेरच्या काळात ते अडखळले - इतकेच नाही, तर ते पडले अन् आपल्याबरोबर मलासुद्धा त्यांनी पाडलं. मी पंधरा वर्षांचा होतो तेव्हाच माझं त्यांनी लग्न करून टाकलं आणि वर्षभराने ते वारले."

प्रेमचंदांच्या निवेदनावरून भलते उदासवाणे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. (ते कष्टदायक होतं हे खरं, पण उदासवाणं?) बाळपण हाच एक आयुष्यातला असा कालखंड आहे की जेव्हा कोणतीच गोष्ट उदासवाणी वाटत नाही. सारे वातावरण जणू जादूने भारलेले. ती जादू म्हणजे काय हे मुलाला कालांतराने मागे वळून पाहताना कळते. तोपर्यंत मूल मोठे झालेले असते. जादू विरलेली असते - कोणत्याही जादूची हीच तऱ्हा असते. प्रेमचंदांच्या बाबतीत मात्र बालपणाची एक व्यथा टिकून राहिली. तिच्यावर जादू चढलीच नाही. ते आठ वर्षांचे होते तेव्हा आई मरण पावली. ते दुःख तीव्र होते. काळीज चिरणारे दुःख. ती जखम आयुष्यभर ताजी राहिली. वडिलांनी पुन्हा लग्न करून सावत्र आई मिळवून दिली. पण म्हणून काही प्रेमचंद सुखी झाले नाहीत. त्यांचे दुःख कमी झाले नाही. पण काही झाले तरी पोरवयात कोणताच मुलगा खंत करीत बसत नाही. त्याप्रमाणे नवाब

लमही – प्रेमचंदांचे जन्मस्थान



ऊर्फ धनपत - हे त्याचं खरं नाव, बरं का? प्रेमचंद हे नंतर घेतलेलं टोपणनाव–हाही रडत कुढत बसला नाही.

आईचा मृत्यू झाला, त्याच सुमाराला या मुलाला जवळच्या एका खेड्यातल्या मौलवींकडे शिकवणी सुरू केलेली होती. त्या काळी कायस्थ जातीतल्या मुलांना जे शिक्षण देत त्यात फारसी नि उर्दू भाषा हेच मुख्य विषय असत. मौलवीसाहेब खरे धंद्याने शिंपी होते. पण फुरसतीच्या वेळात मिळतील ते विद्यार्थी गोळा करून ते एक मदरसा चालवीत. मदरसा म्हणजे शाळा. शाळेचे हजेरी पुस्तक नसे आणि कोण विद्यार्थी शाळेत येतो अन् कोण नाही याची मौलवींना फिकीर नव्हती. फी मिळाल्याशी गाठ! शिवाय घरची कामे करायला अन् बाहेरच्या लहान-सहान कामासाठी पिटाळायला हाताशी इतकी मुले! त्यामुळे मास्तरसाहेब खूष असत. त्याचा फायदा घेऊन नवाब पुष्कळदा शाळेला दांडी मारायचा. (दुसऱ्या दिवशी काहीतरी काल्पनिक सबब तयार असायची!) दिवसभर दुसऱ्याच कुठल्यातरी मजेशीर कार्यक्रमात स्वारी गुंतलेली असे. याचे एक उदाहरण प्रेमचंदांच्या 'चोरी' या आत्मकथनपर गोष्टीत आले आहे ते पाहा -

> कधी कधी आम्ही पोलीस चौकीसमोर उभे राहून त्यांची परेड बघायचो. तर कधी सबंध दिवस एखाद्या माकडवाल्या किंवा अस्वलवाल्या दरवेशाच्या मागे हिंडत असायचो. कधी स्टेशनवर जाऊन आगगाड्यांची अद्‌भुत जा-ये बघत बसायचो. एक वेळ शाळेचं वेळापत्रक आठवत नसेल, पण आगगाड्यांचं वेळापत्रक आम्हाला पाठ असायचं!

आणि अर्थात बाकीचे उद्योग होतेच. गोट्या किंवा विटीदांडूसारखे खेळ खेड्यातल्या मुलांना प्रिय; त्यात नवाब प्रवीण होता. गावाभोवती अनेक तळी होती. त्यातही मासळी पकडून, उघड्यावरच विस्तव पेटवून ती भाजणे, शेतात ऊस पिकला की त्याची दांडकी पळवून आणणे, दगड मारून कैऱ्या पाडणे (नेमबाजीबद्दल नवाब प्रसिद्ध होता बरं का?) आणि असेच करमणुकीचे दुसरे बिनखर्ची प्रकार होतेच. सगळीच मजा होती. ज्यांचा माल चोरून न्यायचा त्यांनी दिलेल्या शिव्याही गोड वाटत आणि शिवाय नवाबाची तर अशी तऱ्हा की सारा दिवस घरी बसून राहण्यापेक्षा तो बाहेर घालवण्यातच त्याला विशेष



आनंद होता. आई वारलेली, बाबा सदैव पोस्टाच्या कामात दंग, घरी सदान्‌कदा कपाळावर आठ्या चढवणारी सावत्र आई, त्यामुळे घरची ओढ अशी नव्हतीच. वडिलांची बदली केव्हा होते, तिकडे याचे डोळे लागलेले असत. बांदा नि बस्ती, अझमगढ नि गोरखपूर, कानपूर नि लखनौ - किती गावे त्याने पाहिली! प्रवास म्हणजे स्वर्गसुख. नवाबची जी गडबड उडायची तिला पारावार नसे. नवे ठिकाण बघण्याची उत्कंठा तर असेच; पण वडीलही खेड्यातल्यापेक्षा अशा शहरी जरा जास्त लाड करीत, आणि वसकन् ओरडायला सावत्र आई नसे - ती पुष्कळदा गावीच राही. मनाच्या आतल्या कप्प्यात नवाबने या आठवणी जपून ठेवल्या होत्या आणि त्या पुढे लिखाणात वापरल्या. *कजाकी* नावाच्या ('कजाकी' हे गोष्टीतल्या टपाल कारकुनाचे नाव) आणखी एका आत्मकथनपर गोष्टीत, प्रेमचंद आपल्या वडिलांविषयी सांगतात :

> बाबांना रागवायला वेळ लागत नसे. त्यांना खूप काम करावं लागे, त्यामुळे ते चिडखोर बनले होते. मी त्यांच्यापुढे जायचं टाळी. त्यांनीही माझ्यावर कधी प्रेमाचा वर्षाव केला नाही. ते घरी जेवणाखाणापुरते दोनदाच येत. प्रत्येक वेळी एकेक तास. बाकीचा वेळ ऑफिसात कागद खरडणे चालू. आपल्याला एखादा मदतनीस मिळावा म्हणून किती वेळा त्यांनी मागणी केली असेल. पण तिचा उपयोग झाला नाही.

बापलेकांत फारसा संवाद नव्हता हे तर उघडच दिसते. आईच्या मृत्यूनंतर एकच व्यक्ती अशी उरली होती की जी आईची माया त्याला देऊ शकली असती. ती म्हणजे मोठी बहीण. पण तिचे लग्न होऊन तीही सासरी गेली. त्यामुळे हा एकाकी उरला. कुठचेही वळण राहिले नाही. एक प्रकारचा बेफिकीरपणा आला. त्यानंतरची पायरी म्हणजे उनाडपणा – हा मुलगा खरोखर उनाडटप्पू बनला असता. बाराव्या वर्षीच स्वारी विड्या ओढायला शिकलीही होती. "इतकंच नाही तर दुसऱ्याही काही गोष्टी, की बालवयात ज्या शिकू नयेत." आपल्या बालपणाविषयीचे हे प्रेमचंदांचे स्वतःचे शब्द आहेत. पण कधी कधी अशा मुलांना विनाशापासून वाचवण्याचे मार्ग नियतीच शोधून काढते, तसे प्रेमचंदांच्या बाबतीत झाले. गोरखपुरात वडिलांबरोबर राहत असताना योगायोगाने त्यांची गाठ बुद्धिलाल नावाच्या एक ग्रंथविक्रेत्याशी पडली.

त्यावेळी मी तेरा एक वर्षांचा होतो. मला हिंदी मुळीच येत नव्हतं. उर्दू कादंबऱ्यांनी मला वेड लावलं होतं. मौलाना शरर, पंडित रतननाथ सरशार, मिर्झा रुस्वा, सरदोईचे मौलवी महंमद अली हे त्या काळातले अतिशय लोकप्रिय कादंबरीकार. त्यांचं कुठचंही पुस्तक हाती पडलं की मी शाळाबिळा विसरून जायचा अन् ते शेवटपर्यंत वाचून काढायचा. रेनॉल्डसच्या कादंबऱ्यांवर तेव्हाचे वाचक तुटून पडत. त्यांची कितीतरी भाषांतरित पुस्तके बाजारात येत अन् हां हां म्हणता खपत. त्यांचंही मला वेड होतं ... रतननाथ सरशार हा एक असा लेखक की तो कितीही वाचला तरी माझं समाधान होत नसे. मी बुद्धिलालच्या दुकानात जाऊन बसायचा; शेल्फातल्या कादंबऱ्या काढायचा अन् वाचायचा. पण सारा दिवस दुकानात बसणं मला शक्य नव्हतं. म्हणून मी इंग्रजी पुस्तकांवरची टिपणबुकं नि मार्गदर्शिका दुकानातून नेऊन वर्गातल्या मुलांना विकी अन् त्या कामाच्या मोबदल्यात कादंबऱ्या वाचायला घरी नेई. त्या दोनतीन वर्षांत शेकड्यांनी कादंबऱ्या मी वाचल्या. हे झाल्यावर नवलकिशोर प्रेसने प्रसिद्ध केलेले पुराणांचे उर्दू अनुवाद वाचले. शिवाय *तिलिस्म-ए-होश्‌रुबा*चे कितीतरी भाग. या सुरस अन् चमत्कारिक ग्रंथराजाचे सतरा खंड तोपर्यंत प्रसिद्ध झाले होते आणि प्रत्येक खंडाची सुपर रॉयल आकाराची दोन हजार पानं होती! या सतरा खंडांखेरीज त्यातल्या वेगवेगळ्या कथा-प्रसंगांवर कितीतरी पुस्तकं निघालेली होती, त्यांचाही मी फन्ना उडवला. ज्याने हा ग्रंथ लिहिला त्याची अचाट कल्पनाशक्ती पाहून मन खरोखर थक्क होतं. असं म्हणतात की मौलाना फैझीने या गोष्टी अकबरासाठी फारसी भाषेत लिहिल्या. हे कितपत खरं आहे मला माहीत नाही. एकमात्र निःशंकपणे म्हणावसं वाटतं की गोष्टींनी भरलेलं एवढं अवाढव्य पुस्तक जगातल्या दुसऱ्या कोणत्याही भाषेत लिहिलं गेलं नसेल. एक ज्ञानकोशच म्हणा ना! ते लिहिण्याचं सोडाच, नुसती त्याची नक्कल उतरून घेण्याचं कामसुद्धा साठ वर्षांच्या आयुष्यात एखाद्याला करता येईल हे अशक्य वाटतं!

मनाची पकड घेणारी कथानकाची रचना हे प्रेमचंदांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होय, ही गोष्ट सर्वांना माहीत आहेच. या त्याच्या गुणामागचे रहस्य कशात असेल याचा उलगडा वरील उताऱ्यावरून होतो. कथानिवेदक म्हणून जे विलक्षण कौशल्य प्रेमचंदांनी प्रगट केले



आहे, त्याचा तेरा ते पंधरा वर्षांच्या वयात केलेल्या या वाचनाने पाया घातला होता, असे म्हणायला हरकत नाही. याला जोड देणारी नवनिर्मितीची स्वाभाविक ओढ अंगी होती, म्हणूनच हा मुलगा संकटातून वाचला, नाहीतर एकलेपणा नि त्यापायी येणारा उन्मार्गीपणा यामुळे तो कुठेतरी भरकटत गेला असता. त्या दोन्ही आपत्तींपासून पुस्तकांनी त्याला वाचवले. एकलेपणाची पोकळी त्यांनी भरून काढली आणि त्याच्या साहसाला नि कल्पक वृत्तीला त्यांनी मार्ग दाखवून दिला.

याच सुमाराला नवाबने आपले पहिले लिखाण केले. एक लहानसे नाटक. नवाबचा एक दूरचा आप्त त्याची अखंड चेष्टा करी, टर उडवी. त्याचा पुरेपूर सूड या नाटकाच्या रूपाने नवाबने घेतला! त्याचे काय झाले - हा गृहस्थ बायांच्या नादी लागला होता. त्यामुळे त्याच्यावर तोहमत आली. अर्थात् चावट भाषेत त्याचे वाभाडे काढायला ही एक चांगली संधी होती आणि तिचा नवाबने फायदा घेतला. त्या गृहस्थाची यत्किंचित् बाकी ठेवली नाही. पण दुर्दैवाने हे नाटक कधी प्रकाशातच आले नाही. तरी नाटकाच्या मूळ नायकाचा चेहरा ते वाचून गोरामोरा झाला असेल ते आपण कल्पनेनेच ताडावे. त्याने ताबडतोब तिथून पळ काढला असेल, पण पळण्यापूर्वी नाटकाचे हस्तलिखित त्याने अग्नीच्या भक्ष्यस्थानी टाकले असेल हेही अशक्य नाही. काही असो, या प्रसंगाने आमच्या लेखकाला लेखणीचे सामर्थ्य काय असते, याची पहिली चुणूक बघायला मिळाली यात शंका नाही.

बहुतेकांच्या वाट्याला रोजचा कंटाळवाणा नीरस जीवनक्रम येत असतो. तसेच नवाबचेही चालू होते. अद्‌भुत, भव्य असे काही घडतच नव्हते. पण मग एक विशेष गोष्ट घडली. ती म्हणजे पंधराव्या वर्षी या मुलाचे लग्न झाले. पहिल्याने खूप मजा वाटली त्याला; पण मग त्यातली भीषणता जाणवू लागली. कारण तो नुसताच बालविवाह नव्हता. तर अतिशय विषम असा विवाह होता. विजोड वधू-वर एकत्र आले होते. बरं, वडीलही त्यानंतर जास्त काळ जगले नाहीत; पुढल्याच वर्षी ते वारले. एका छोट्या आत्मचरित्रपर निबंधात प्रेमचंद म्हणतात :

> मी त्यावेळी नववीत होतो. घरी मला बायको होती. सावत्र आई अन् तिची दोन मुलं होती. उत्पन्न अजिबात नव्हतं. जी काही थोडी फार बचत केलेली होती ती सगळी वडिलांच्या सहा महिन्यांच्या आजारात अन् मग त्यांच्या अंत्यविधीसाठी खर्ची पडली आणि माझी तर आकांक्षा होती एम.ए. होण्याची – वकील होण्याची!

त्या काळीदेखील नोकरी मिळवणं आजच्या इतकंच कठीण असे. खूप खटपट करावी, तेव्हा कुठे दरमहा दहाबारा रुपयांचं एखादं काम मिळायचं. पण मी निग्रहाने माझं शिक्षण चालू ठेवलं. आपल्या पायात बेड्या आहेत आणि त्या साध्या लोखंडाच्या नसून सर्व धातू एकत्र ओतून बनवलेल्या आहेत आणि तरी आपण डोंगराचं शिखर गाठण्यासाठी धडपडतो आहोत, असं काहीतरी मला वाटत होतं.

जगणे कठीण झाले होते. "पायात जोडे नाहीत अन् अंगातले कपडे फाटलेले किंवा उसवलेले." त्या दिवसांबद्दल लिहितांना प्रेमचंद त्या छोट्या निबंधात म्हणतात :

> बनारसच्या क्वीन्स कॉलेजच्या हायस्कूलमध्ये मी शिकत होतो. मुख्याध्यापकांनी मला फी माफ केली होती. परीक्षा जवळ आल्या होत्या. मी साडेतीन वाजता सुटलो की शहराच्या बांबू गेट नावाच्या भागात जाई. तिथे एका मुलाची शिकवणी करी. चार वाजता तिथे पोहचे अन् सहापर्यंत थांबे. मग घरी जायला निघे. घर होतं पाच मैल दूर खेड्यात. भराभर चाललो तरी आठ वाजेपर्यंत पोचायची शक्यता नसायची आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा आठ वाजता निघणे भाग असे. एरवी शाळा वेळेवर गाठायची कशी? रात्रीच्या जेवणानंतर मी चिमणी पेटवून तिच्या उजेडात अभ्यासाला बसे. झोप केव्हा लागली कळत नसे. पण शिकण्याचा माझा अगदी निर्धार झालेला होता.

वडिलांच्या मृत्यूनंतर परिस्थिती आणखीच बिकट झाली. घरचे वातावरण अस्थिर, त्यामुळे त्या वर्षी परीक्षा दिलीच नाही. पुढल्या वर्षी - 1898 साली परीक्षेला बसले, पास झाले. पण दुसऱ्या वर्गात. आता क्वीन्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्याची आशा राहिली नाही. कारण पहिल्या वर्गात येणारांनाच त्या कॉलेजात घेत असत. बनारसच्या हिंदू कॉलेजची याच वर्षी स्थापना झाली होती. प्रेमचंदांनी या नव्या संस्थेत जायचे ठरवले. पण तीही आशा सफल झाली नाही. कारण प्रवेशपरीक्षा दिली, तिथे गणित विषयात अपशय! गणिताचा प्रेमचंदांना मोठा बाऊ वाटे. ते लिहितात. "गणित म्हणजे मला माऊंट एव्हरेस्ट वाटे! ते कधी गाठणं शक्य नव्हतं!" या गणिताच्या अडसरामुळे त्यांना हिंदू कॉलेजात तर प्रवेश मिळाला नाहीच, पण पुढे कित्येक वर्षे इंटरमीजिएट परीक्षाही पास होता आले नाही. दोन वेळा खाजगी विद्यार्थी म्हणून परीक्षेला बसून



दोन्ही वेळा नापास झाल्यावर त्यांनी निराशेने तो नाद सोडला. शेवटी पूर्वीचे नियम बदलले आणि गणिताऐवजी दुसरा विषय घेणे जेव्हा शक्य झाले तेव्हा - 1916 साली त्यांना या परीक्षेत उत्तीर्ण होता आले. मॅट्रिकनंतर बरोबर 18 वर्षांनी इंटर!

पण ही पुष्कळ पुढची गोष्ट. हिंदू कॉलेजात प्रवेश न मिळाल्यामुळे तीव्र निराशा वाटून प्रेमचंद घरी गेले, तेव्हाही विद्यार्जनाच्या लालसेने त्यांना सोडले नव्हते.

> घरी बसून मी काय करणार होतो? प्रश्न होता तो हा की गणित कसं सुधारायचं अन् कॉलेजात प्रवेश कसा मिळवायचा? त्यासाठी शहरात राहायला हवं. सुदैवाने मला एक काम मिळालं. एका वकिलाच्या मुलांना शिकवायचं काम. फी पाच रुपये. मी ठरवलं की दोन रुपयांत राहायचं अन् तीन रुपये कुटुंबाच्या खर्चाला द्यायचे. वकिलांच्या घराच्या तबेल्यावर एक लहानसा माळा होता. चिखलामातीची खोली. तिथे राहण्याची मला परवानगी मिळाली. बिछाना म्हणून एक गोणपाटाचा तुकडा पसरला. बाजारातून एक लहानसं दिवटं आणलं आणि माझा शहरातला मुक्काम सुरू झाला. घरून काही भांडीकुंडीही आणली. दिवसातून एकदा कसलीतरी कांजी शिजवीत असे, अन् भांडी घासून झाली की मी लायब्ररीत जायचो. निमित्त गणिताचं पण मी बहुतेक वेळ कादंबऱ्या वाचण्यात घालवी. याच काळात मी पंडित रतननाथांच्या *फसाना-ए-आजाद* (आजादची नवलकथा), तसंच *चंद्रकांता संतती* (चंद्रकातांचे वंशज) या दोन्ही कादंबऱ्या वाचून काढल्या. बंकिमचंद्र चतर्जींच्या पण उर्दूत भाषांतर झालेल्या जेवढ्या म्हणून कादंबऱ्या मिळाल्या, तेवढ्या मी वाचल्या.

आणि तरी त्यांचे विद्यार्थिदशेतले दारिद्र्य पूर्वीइतकेच भयानक होते.

> त्या हिवाळ्यात माझ्याजवळ एक दिडकीही नव्हती. दररोज स्वस्तात स्वस्त धान्याची भाकर अन् तीही एकदाच खाऊन मी काही दिवस काढले. सावकार मला कर्ज नाकारीत तरी किंवा शरमेमुळे मीच मागत नसे. एक दिवस अंधार पडायच्या सुमारास मी एका बुकसेलरच्या दुकानात गेलो, माझ्याजवळचे *चक्रवर्तीज् मॅथेमॅटिक्स् की* हे पुस्तक विकायला. दोन वर्षांपूर्वीच मी ते विकत घेतलं होतं. मोठ्या मिनतवारीने आतापर्यंत मी त्याला चिकटून होतो.

आज पूर्ण निराशेनं मी ते फुंकून टाकायला निघालो. मला त्याची दोन रुपये किंमत पडली होती पण आता मी एक रुपयात सौदा ठरवला. तो रुपया घेऊन मी दुकानाबाहेर पडतो आहे तोच तिथे बसलेल्या एका जाडजूड मिशांच्या गृहस्थांनी मला विचारलं, "काय शिकताहात तुम्ही?"

"शिकत बिकत नाहीय. पण कुठेतरी नाव नोंदवण्याची इच्छा आहे," मी म्हणालो.

"मॅट्रिकची परीक्षा झालीय? नोकरी करायची नाही का?"

"नोकरी मिळतेय कुठे?"

हे गृहस्थ एका लहानशा शाळेचे मुख्याध्यापक होते आणि त्यांना एक दुय्यम शिक्षक हवा होता. मला त्यांनी अठरा रुपये देऊ केले. मी तयार झालो. माझी कल्पनाशक्ती नैराश्याने इतकी दबलेली होती, की तिने त्या काळात केवढीही झेप घेतली, असती, तरी तिला अठरा रुपये दिसले नसते! दुसऱ्याच दिवशी त्यांना भेटण्याचं कबूल करून मी निघालो, त्यावेळी माझं डोकं पार आकाशाला भिडलं होतं. ही गोष्ट 1899 सालची आहे. सर्व गोष्टींना माझी आता तयारी होती आणि त्या गणिताने कोलदांडा घातला नाही, तर मी नक्कीच पुढे जाणार होतो. पण सर्वांत मोठा अडथळा होता तो खुद्द विद्यापीठाकडून. 'युनिव्हर्सिटी' या संस्थेजवळ त्या काळात समजूतदारपणाचा संपूर्ण अभाव असायचा. पुढेही कित्येक वर्षे तो नाहीसा झाला नाहीच! एखाद्या डाकूप्रमाणे ती तावडीत सापडलेल्या लहान-मोठ्या सर्वांना सारख्याच चौकटीत बसवीत असे.



# तीन

बनारसपासून चाळीस मैलांवर चुनार गाव आहे. लहानसे शांत ठिकाण. गावचा जुना किल्ला आता एका ब्रिटिश सैन्याच्या रेजिमेंटची छावणी बनला होता. प्रेमचंद ताबडतोब जाऊन कामावर रुजू झाले. सर्व बाजूंनी निराशा ग्रासू लागली असताना, त्यांना दैवाने अचानक हात दिला होता.

अशा रीतीने शाळामास्तर म्हणून त्यांची जीवनराहटी सुरू झाली आणि ती पुढे बावीस वर्षे टिकली.

तसे म्हणाल तर हे जीवन रटाळच होते. शाळा सुटल्यानंतर करायला काहीच नसे. पण या माणसाला चिंता नव्हती. पुस्तके तर होती ना? लोक त्यांना हां हां म्हणता 'पुस्तकातला किडा' म्हणून ओळखू लागले. पण (पुस्तकातलाही) किडा पुष्कळदा उलटतो म्हणतात. तसेच झाले. यांच्या शाळेचा संघ नि लष्कराचा संघ यांच्यात एक फुटबॉलचा सामना झाला. प्रेक्षकांत शाळेतली मुले जास्त, ती साहजिकच आपल्या खेळाडूंना जोरजोराने उत्तेजन देत होती. भरीस भर म्हणून लष्कराचा संघ हरला. शाळेने "हिप्-हिप्-हुर्रे" असा त्रिवार घोष करून आपल्या संघाचे अभिनंदन केले. सैनिकी बाण्याचे प्रतिस्पर्धी हे बरे सहन करतील! त्यांच्यातल्या एकाने शाळेच्या एका खेळाडूला चांगली जोरदार 'किक्' हाणली. यात म्हणजे विशेष काही होते, असे नाही. सामने संपल्यावर वातावरण खळबळीचे असे अन् अशी भांडणे पुष्कळदा होत. पण तरुण प्रेमचंदही तिथे होता त्याला – काय असेल ते असो - तो प्रकार सहन झाला नाही. त्यात त्याला बहुधा गोऱ्या कातडीचा हुकुमीपणा नि उद्दामपणा यांचे चित्र दिसले असेल. या गोऱ्या इसमाने दुसऱ्या गोऱ्या इसमाला अशी लाथ मारली असती का? नाही! - जवळचे कुंपणाचे दांडके त्याने उपटून काढले आणि तो लष्करवाल्यावर धडाक्याने धावून गेला. मग दुसरे शाळकरीही त्याला सामील झाले आणि 'टॉमीज' ना असा दणक्यात मार मिळाला की जन्मात त्यांनी तो विसरू नये!

ही मारामारी संपल्यावर प्रत्येकाच्या लक्षात आले की हिचा पुढारी कोण होता - तर पुस्तकांतला एक गुपचूप किडा! कुणाला कल्पना तरी आली असती का, की या माणसाच्या

अंगात एवढं लढाऊ रक्त असेल? नाही आणि नव्हतेच तसे रक्त त्यांच्या अंगात. खरं म्हणाल तर लहान-सहान खाजगी गोष्टीत त्याला एखाद्याने भित्रा ठरवले असते. पण ही गोष्ट तितकी किरकोळ नव्हती. जेव्हा जेव्हा राष्ट्रीय प्रतिष्ठा पणाला लागायची किंवा सामाजिक न्याय पायाखाली तुडवला जायचा, तेव्हा प्रेमचंद गप्प बसणे शक्य नसे. अशावेळी हा माणूस सावधगिरीच्या साऱ्या कल्पना झुगारून द्यायचा आणि पूर्ण निर्भयपणे कृती करायचा.

प्रेमचंदांचा निर्भयपणा लवकरच पुन्हा एकदा कसोटीला लागला. त्यांच्या एका सहकाऱ्याला - मौलवी इब्न अली याला - अधिकाऱ्यांच्या रोषाला तोंड द्यावे लागले.

आतापर्यंतचे प्रेमचंदांचे जीवन अगदी रूक्ष होते आणि तसेच ते पुढे चालू राहिले. अठरा रुपये मोठी दौलत नव्हती. स्वतःची नि घरच्यांची गुजराण एवढ्या पैशांत करणे सोपे नव्हते. म्हणजे आर्थिक परिस्थिती अजून हलाखीचीच होती. नुकताच आपला लोकरीचा कोट त्यांनी विकून टाकला होता. ही नोकरी मिळाली हाच तेवढा सुयोग म्हटला पाहिजे. भवितव्य अंधारानेच भरलेले होते. थोडा विवेक बाळगला असता तर बिघडले नसते. पण प्रेमचंदांनी दुसऱ्यांदा विचार केलाच नाही. अधिकारीवर्ग मौलवीवर अन्याय करतो आहे अशी त्याची खात्री पटली होती; तेव्हा त्याला उघड पाठिंबा देणे एवढेच त्यांना माहीत होते. परिणाम असा झाला की कुऱ्हाडीचा घाव पडला तेव्हा तो एकट्या त्या मौलवीवर पडला नाही. प्रेमचंदांनाही त्याचा प्रसाद मिळाला आणि वर्ष संपायच्या आत स्वारी पुन्हा बेकार बनून रस्त्यावर आली.

पण भाग्याची गोष्ट अशी की क्वीन्स कॉलेजचे प्राचार्य मि. बेकन यांना हा तेजस्वी तरुण आवडला होता. ते मध्ये पडले आणि शिक्षणखात्यात त्यांच्या शब्दाला मान असल्यामुळे प्रेमचंदांना पुन्हा शिक्षकाची नोकरी मिळाली - बहराइच गावच्या सरकारी शाळेत.

यानंतर 1821 पर्यंत प्रेमचंदांनी निरनिराळ्या गावी सरकारी शाळांमधून शिकवले. प्रतापगड, अलाहाबाद, कानपूर, हमीरपूर, बस्ती, गोरखपूर वगैरे. अशी दोनतीन वर्षांनी वारंवार बदली झाल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला. पण लेखक म्हणून त्यांचे कल्याण झाले. लेखकाचे सर्वांत मोठे भांडवल म्हणजे जीवनानुभव. तो जितका विविध आणि समृद्ध असेल तितके चांगलेच. स्वतःच्या या संपदेत लेखक निरंतर भर टाकीत असतो आणि त्यातलेच धन लेखनासाठी काढून घेत असतो. हा अनुभवाचा निधी आटला की लेखकही सुकून जातो; लिहिण्याचा थांबतो. पण या बाबतीत प्रेमचंद फार सधन होते.





सुब्बुलक्ष्मी – तमिळ गायिका – प्रेमचंदांच्या '*सेवासदन*'मधील भूमिका

पहिल्यापहिल्याने फार हलाखीत दिवस काढले. पण गंमत अशी की त्यामुळेच त्यांना लेखनासाठी एवढा संपन्न कच्चा माल मिळाला! आणि आता नोकरीच्या निमित्ताने जागोजाग भटकावे लागत होते खरे; पण रोजच्या भातभाकरीची तरी काळजी नसल्यामुळे त्यांना या भटकंतीपासून फायदा होत होता. त्यांच्यातला लेखक अधिकाधिक विकास पावत होता.

यामुळे प्रेमचंदांनी आता - म्हणजे 1900 च्या सुमाराला लेखनाकडेच लक्ष पुरवण्याचा गंभीरपणे विचार केला याचे नवल वाटायला नको. दुर्दैवाने त्यांचे ते प्रारंभीचे साहित्य आज टिकून राहिलेले नाही. त्यातले सर्वांत आधीचे एक लिखाण काही वर्षांपूर्वी प्रकाशात आले. ते म्हणजे *असरार-ए-माबिद* (मंदिरातील रहस्ये) नावाची अपूर्ण उर्दू कादंबरी. बनारसच्या एका फारशा प्रसिद्ध नसलेल्या साप्ताहिकात 1903 ते 1905 या काळात त्रोटक हप्त्यांनी क्रमशः छापून आलेली कादंबरी पूर्ण झालीच नसावी असे दिसते. या छोट्या कादंबरीत एका मंदिर पुजाऱ्याचे रंगेल जीवन चवाट्यावर आणले आहे. लेखनशैली जुन्या 'रोमँटिक' कथांसारखी. प्रेमचंदांनी मुख्यतः तसलीच पुस्तके पूर्वी वाचलेली होती. तरी पण त्यात अन् यात एक फरक होता. या लेखकाचा दृष्टिकोन वेगळा होता. निव्वळ करमणुकीसाठी तो लिहीत नव्हता. त्याला वाचकांना काही शिकवायचेही होते. कारण निर्मितिक्षम साहित्य हे वाचकाच्या मनावर भावनांचे संस्कार करून त्याला शिक्षण देत असते. आणखी एक मोठी कादंबरी प्रेमचंदांनी याच सुमाराला लिहिली होती – *हम खुर्मा ओ हम सवाब*. तिचा हिंदी अनुवाद *प्रेम* या नावाने 1907 मध्ये प्रसिद्ध झाला. बालवयातच विधवा झालेल्या स्त्रियांविषयी पुष्कळांनी वाचले असेल. काहींनी त्यांचे जीवन प्रत्यक्ष पाहिले असेल. जुन्या सनातनी रूढीप्रमाणे अशा बायकांना जन्मभर रूक्ष, एकाकी जीवन कंठावे लागे. *प्रेम* कादंबरीत एका बालविधवेचे चित्र रंगवले आहे. एक ध्येयवादी तरुण तिच्याशी लग्न करतो.

प्रेमचंद केवळ एक लेखक म्हणून ही शिकवण देत नव्हते. असे करणे न्याय आहे ही त्यांची श्रद्धा होती आणि याचा प्रत्यय लवकरच आला. त्यांचे पहिले लग्न पूर्णपणे अपयशी ठरल्यानंतर त्यांनी 1906 साली दुसरा विवाह केला, तो शिवराणीदेवी नावाच्या बालविधवेशी. तिच्यापासून त्यांना सहा मुले झाली. त्यांतली तीन आज हयात आहेत.



# चार

स्वातंत्र्याचा लढा लोकजागृतीतून आणि बहुजनसमाजाकडूनच लढवला पाहिजे, असा विचार मांडणारे बाळ गंगाधर टिळक हे राष्ट्रसभेतले (काँग्रेसमधले) पहिलेच पुढारी होत. त्यापूर्वी काँग्रेसने चालविलेली राष्ट्रीय चळवळ म्हणजे चर्चा नि वाटाघाटींचा घोळ असे. या वाटाघाटी मूठभर राजकारणी लोक ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी करीत आणि देशाच्या कारभारात भारतीयांना वाटेकरी करणे कसे शक्य आहे ते त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत. पण दुर्दैवाने लोकमान्य फार काळ बाहेर राहिले नाहीत. 1908 मध्येच ब्रिटिशांनी त्यांना अटक केली आणि मंडालेला धाडले. प्रेमचंदांवर मात्र आधीच त्यांचा प्रभाव पडला होता. कर्झनने बंगालची फाळणी करण्याचा दुष्ट डाव रचला तेव्हा ठिणगी पडण्यासारखे होऊन देशात स्वदेशीची उग्र चळवळ सुरू झाली. पूर्वी कधी नव्हती इतकी प्रेमचंदांना आता स्वातंत्र्यसंग्रामाची ओढ उत्पन्न झाली. स्वदेशी चळवळीतून पुढे अनेक गुप्त संघटना निर्माण झाल्या होत्या. (आणि नंतर देशाच्या इतर भागांतही त्या पसरल्या होत्या.) ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले होते. राष्ट्राला पूर्णपणे वाहून घेतलेले आणि मृत्यूचीही पर्वा न करणारे क्रांतिकारक या गुप्त मंडळात असत. लोकमानसातला स्फुल्लिंग चेतविण्याचे काम या मंडळींनी केले तर त्यात आश्चर्य नाही. तरुण प्रेमचंदांची कल्पनाशक्तीही त्यांनी चेतवून दिली आणि त्या प्रेरणेतून त्यांनी गॅरिबाल्डी व मॅझिनी या पाश्चात्त्य वीरांच्या छोट्या चरित्रांसारखे अनेक स्फुट लेख लिहिले. भारतीय संस्कृतीची भव्यता ज्यांनी आपल्या विजयी स्वरात पाश्चात्त्यांना पटवून दिली आणि भारतीयांकडे नव्या चष्म्यातून पाहणे भाग पडले त्या विवेकानंदांचेही चरित्र त्यांनी लिहिले. विवेकानंद हे एक नव्याच प्रकारचे संन्यासी होते. त्यांचा संदेश त्या काळात जितका ताजा नि चैतन्यदायी वाटला तितकाच तो आजही आपल्याला वाटतो. प्रेमचंदांनी स्वामीजींवर जो छोटा चरित्रलेख लिहिला, त्यात तो संदेश पुढील शब्दांत उद्धृत केला होता :

माझ्या तरुण मित्रांनो, बलवान् व्हा! माझा तुम्हाला उपदेश आहे तो एवढाच. गीता वाचण्यापेक्षा फुटबॉल खेळाल तर जास्ती सहज स्वातंत्र्य मिळवाल. तुमचे स्नायू समर्थ नि ताकदवान् असतील तर गीतेची शिकवणही तुम्हाला चांगली कळेल. गीता ही कुणा भेकडाला सांगितलेली नव्हती. ती अर्जुनाला सांगितली होती आणि अर्जुन हा शूर बलशाली पुरुष होता.


याच कालखंडात प्रेमचंदांनी कितीतरी देशभक्तिपर कथा लिहिल्या; त्यातली पहिली कथा *सर्वांत मौल्यवान् रत्न* ही होती. या कथेची धाटणी जुन्या वळणाची, म्हणजे त्या काळी लोकप्रिय असलेल्या 'रोमान्स' किंवा कल्पनारम्य गोष्टींसारखी असली तरी तिच्यातून एक नवा विचार निघताना दिसतो. कथेच्या अखेरीस असे स्पष्टपणे बजावले आहे की देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात सांडलेला रक्ताचा एकेक थेंब हे जगातले सर्वांत मौल्यवान् रत्न होय. ही आणि अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या गोष्टी एकत्रित केलेले पुस्तक पुढे 1909 साली *सोज-ए-वतन* (मातृभूमीची दुःखे) या नावाने प्रसिद्ध झाले आणि त्याने लवकरच सरकारची दृष्टी वेधून घेतली. 'नवाब राय' या नावाखाली पुस्तक प्रकाशित झाले होते. पण त्या मागचे व्यक्तित्त्व कुणाचे आहे हे शोधायला सरकारला वेळ लागला नाही. आणि मग एकच खळबळ उडाली.

त्या वेळी मी हमीरपूर जिल्ह्यात नोकरी करीत होतो. शिक्षण खात्यातला डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणून. हा कथासंग्रह प्रसिद्ध होऊन सहा महिने झाल्यावर एका संध्याकाळी मी माझ्या तंबूत असता हुकूम आला, 'कलेक्टर साहेबांना भेटण्यास या म्हणून.' साहेब हिवाळी दौऱ्यावर आलेले होते. मी लगेच बैलगाडी जोडली, रातोरात तीसचाळीस मैलांची मजल मारली आणि दुसऱ्या दिवशी त्यांना भेटलो. त्यांच्या पुढ्यात माझ्या पुस्तकांची प्रत पडलेली होती. माझ्या डोक्यात थडथडू लागले. त्या काळात नवाब राय या टोपणनावानेच मी लिहीत असे. या पुस्तकाचा लेखक कोण असेल याचा तपास गुप्त पोलिस करीत आहेत, यांची काहीशी कल्पना मला आलेली होतीच. तेव्हा मला आता बोलावलेलं आहे ते जाब विचारण्यासाठी हे मी ओळखलं.

"तुम्हीच लिहिलंत का हे पुस्तक?" कलेक्टरसाहेबांनी विचारलं.

"होय मीच," मी उत्तर दिलं.





प्रेमचंदांचे उर्दू हस्ताक्षर

यावर त्यांनी 'प्रत्येक गोष्टीचा कथाविषय काय आहे ते सांगा' म्हटलं. सगळं झाल्यावर ते पुरते भडकले अन् म्हणाले, "तुमच्या कथा राजद्रोहाने भरलेल्या आहेत. तुमचं नशीब समजा की ही ब्रिटिश राजवट आहे. मोगल साम्राज्यात तुमचे दोन्ही हात छाटण्याची सजा झाली असती.'

"शेवटी निकाल असा झाला की मी पुस्तकाच्या सर्व प्रती सरकारच्या ताब्यात द्याव्यात आणि यापुढे कलेक्टरच्या परवानगीवाचून कोणतेही लेखन करू नये." मनात म्हटलं थोडक्यावर सुटलो!

एका दृष्टीने प्रेमचंद थोडक्यावर सुटले होते. पण शर्त अशी होती की कलेक्टरच्या परवानगीवाचून काही लिहायचे नाही आणि हे अशक्य कोटीतलेच होते. नवाब राय या गोष्टीला तयार नव्हते. तेव्हा त्यांनी आपले नाव बदलून 'प्रेमचंद' घेतले आणि पूर्वीइतकेच धारदार लिहिणे चालू ठेवले. वरून शांत दिसणाऱ्या या पुरुषाच्या अंतर्यामी शक्तीचा मोठाच राखीव संचय होता! ब्रिटिशांच्या असल्या दंडेलीने लटपटून जाण्याऐवजी त्याने दुसरीच कृती केली. खुदीराम बोस या चौदा वर्षे वयाच्या क्रांतिकारकाचे चित्र घरी आणून त्याने आपल्या भिंतीवर ठळकपणे लावले. खुदीरामला नुकतेच ब्रिटिशांनी फासावर लटकावले होते.

1905-21 हा काळ हे भारताच्या आणि जगाच्या इतिहासातले एक विलक्षण आणीबाणीचे ओजस्वी पर्व होते. या काळाचे काही पैलू असे :

राष्ट्रीय नेता म्हणून टिळकांचे आगमन.
बंगालमध्ये 1905 साली स्वदेशी चळवळीचा प्रारंभ.
बॉम्ब - पिस्तुलवाल्या क्रांतिकारक मंडळांची स्थापना.
मिंटो-मोर्ले सुधारणा - 1909
पहिले जागतिक महायुद्ध - 1914-18
रशियन राज्यक्रांती - 1917.

गांधींचे दक्षिण आफ्रिकेतून भारतात पुनरागमन - 1918. ब्रिटिशांच्या युद्ध प्रयत्नात सहकार म्हणून ब्रिटिश सैन्यातल्या रिक्रूटभरतीला ते मदत करतात. ब्रिटिशांकडून सद्भावनेला दुटप्पी जबाब मिळतो. एक बाजू मिष्टान्न (मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा 1918) आणि दुसरी बाजू निर्घृण (जालियनवाला बागेतील कत्तल 1919).




**गांधीची असहाकरितेची चळवळ – 1921**

महान घटनांनी भरलेला तो काळ होता यात शंका नाही. त्यावेळी प्रेमचंद उत्तर प्रदेशातल्या लहानसहान गावी, खेड्यांत राहत असत. पण जगापासून आपण तोडले जाऊ नये म्हणून त्यांनी खूप धडपड केली. वर्तमानपत्रे वाचण्याचा त्यांना विलक्षण हव्यास होता; आणि कुठेही कानाकोपऱ्यात राहत असले तरी अन् कितीही उशीर लागला तरी वर्तमानपत्र मिळवून ते वाचीतच. चालू राष्ट्रीय नि आंतरराष्ट्रीय घडामोडी त्यांचे मन चटकन् टिपून घेई ते केवळ योगायोगाने नव्हे, तर त्यांच्या या अट्टाहासामुळेच. रशियातल्या समाजवादी क्रांतीची प्रतिक्रिया या देशामध्ये ज्यांच्या मनावर प्रथम उमटली त्यांत प्रेमचंद एक होते. क्रांतीला जेमतेम सहा महिने लोटले असतील. तिथल्या बातम्यांबाबत जगभर अजूनही गुप्तता राखली जात होती, आणि तरी या क्रांतीचा गौरवपर उल्लेख प्रेमचंद त्या वेळी लिहीत असलेल्या *गोशा-ए-आफियत* या उर्दू कादंबरीत आढळतो. याच कादंबरीचा पुढे हिंदीत *प्रेमाश्रम* नावाने अनुवाद झाला. प्रेमचंदांच्या या भूमिकेचा आणखी एकवार प्रत्यय येतो, तो 21 डिसेंबर 1919 रोजी एका मित्राला लिहिलेल्या पत्रात. त्यावेळी बऱ्याच गाजत असलेल्या मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांचा त्यांनी त्या पत्रात धिक्कार केलेला आहे :

> ... या सुधारणांमध्ये एकच गुण आहे. तो म्हणजे सुशिक्षित वर्गांना त्यामुळे काही खास सवलती मिळत आहेत. आतापर्यंत सुशिक्षित समाज वकील बनून सामान्य जनांचे रक्त पीत असे. यापुढे राज्यकर्ते बनून तो तेच करीत राहील.

प्रेमचंद काळाबरोबर प्रगती करीत होते, यात संशय नाही. खरे म्हणजे एकदोन पावले ते पुढेच असत. त्या काळी त्याची प्रकृती खूपच बिघडलेली होती. त्यांना संग्रहणीचा रोग जडलेला होता. त्यामुळे शरीर म्हणजे हाडांचा सापळा बनले होते. पण पराभव मानायला ते तयार नव्हते. राष्ट्रभर जी खळबळ उडाली होती तिने त्यांनाही ग्रासले होते. स्वस्थता त्यांना माहीत नव्हती. ते खस्ता खात होते. दिवसभराचा कामाचा रगाडा आटोपला की रात्री ते उशिरापर्यंत लिहीत बसत किंवा कधीकधी (बायकोच्या लक्षात येऊ नये म्हणून) मध्यरात्री केव्हातरी उठून शांतपणे दिवा पेटवीत अन् सकाळपर्यंत लिखाण करीत. उठल्यावर काही घरकामे असायचीच आणि मग शाळा. झपाटल्यासारखे ते लिहीत पण वर वर पाहणाऱ्याला ते अतिशय शांत वाटत. आपल्या लेखनाचे त्यांनी कधीही स्तोम माजविले नाही. जी माणसे खऱ्या अर्थाने व्यग्र असतात त्यांना कोणत्याही कामाला वेळ मिळू शकतो.



प्रेमचंद – वय वर्षे चाळीस

प्रेमचंद तसे होते आणि तरी संथपणे काम करीत राहण्याची जणू एखादी यंत्रणा त्यांच्या अंगात बसवलेली होती! एखादा शेतकरी जसा आपसूक पहाटे उठून नांगराला बैल जुंपतो अन् शेतावर जातो, तसा काहीसा हा प्रकार होता. त्यांच्यात कृत्रिमता नावालाही नव्हती. 'सृजनक्रियेची लहर' 'मूड' वगैरे गोष्टी ते मानीत नसत. त्यांची कलेची प्रेरणा इतकी तकलादू नव्हती; मजबूत होती. त्यांनी स्वतःची इतकी तयारी केलेली होती की केव्हाही, कुठेही बैठक मारून ते लिहू शकत. आपल्या 'मूड' वर त्यांची हुकूमत होती, त्याचे ते गुलाम नव्हते. जनतेसाठी आणि जन-स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याच्या भावनेमुळेच कदाचित त्यांना हे जमले असेल आणि स्वातंत्र्याची त्यांची कल्पना म्हणजे नुसती ब्रिटिश गुलामगिरीतून सुटका एवढीच नव्हती. एतद्देशीयांच्या पिळवणुकीतून त्यांना बहुजनसमाज मुक्त व्हायला हवा होता. त्यांची ही समर्पणवृत्ती इतकी खरीखुरी होती की कधी कधी वाटते - प्रेमचंद स्वतःला बंदुकीऐवजी लेखणी घेतलेला एखादा सैनिक तर समजत नाहीत? अनेक अडथळे त्यांच्या मार्गात आले असताही या काळात त्यांनी खूप लेखन केले. लघुकथा कितीतरी लिहिल्या; लहानमोठ्या कादंबऱ्या लिहिल्या; टॉलस्टॉयच्या नीतिकथा व गोष्टींचे त्यांनी भाषांतर केले आणि जिव्हाळ्याच्या चालू विषयांवर अनेक निबंध लिहिले. या निबंधांतून त्यांनी स्वातंत्र्याची जनतेच्या शब्दांत व्याख्या केली. कालांतराने राष्ट्रीय चळवळीने हीच व्याख्या घेऊन जनतेत आपला संदेश पसरविला आणि हे स्वप्न साकार करण्यास सुरुवात केली. प्रेमचंदांच्या या कादंबऱ्या म्हणजे एक तर *जलवा-ए-इसार* किंवा *वरदान*. बंकिमचंद्रांच्या *आनंदमठ* पद्धतीची ही कथा आहे. तिचा नायक असतो एक देशभक्त संन्यासी. दुसरी *बाजार-ए-हुस्न* किंवा *सेवासदन*. हिचा विषय आहे वेश्याव्यवसायरूपी सामाजिक रोग. तिसरी *गोशा-ए-आफियत* किंवा *प्रेमाश्रम*. हीत आणखी एका सामाजिक रोगाचा समाचार घेतलेला आहे. तो म्हणजे जमीनदारी ही संस्था. यातला जमीनदार नुसताच जमिनीचा मालक असतो. तिच्या मशागतीसाठी तो बोटही उचलीत नाही. उलट त्याच्यासाठी शेत पिकवणाऱ्या मजुराचे तो जळूप्रमाणे रक्तशोषण करतो. या अन्यायावर कादंबरीत जो उपाय सुचविला आहे तो कदाचित् आधुनिक वाचकाला फार आदर्शवादी वाटेल, पण तो मुद्दा नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की प्रेमचंदांनी अर्ध्या शतकाच्याही पूर्वी हे प्रश्न पुढे मांडले आणि तेही आपल्या कथा-कादंबऱ्यातून. कथा-कादंबऱ्या म्हणजे त्या काळी फक्त नवलपूर्ण प्रेमकथा असत. प्रेमचंदांनी त्यांचा वापर गंभीर वाङ्मयीन उद्दिष्टांसाठी केला आणि अशा रीतीने सहेतुक कादंबऱ्यांची नवी प्रथा हिंदी व उर्दू या दोन्ही भाषांमध्ये त्यांनी सुरू केली.

# पाच

गांधीजी आता राष्ट्राचे धुरीण बनले होते. देशभर त्यांनी दौरा सुरू केला होता. आगामी लढ्यासाठी लोकांना ते तयार करीत होते. 8 फेब्रुवारी 1921 रोजी ते गोरखपूरमध्ये आले; आणि तिथे त्यांनी एक सभा घेतली. सभेत त्यांनी जे आवाहन केले ते सर्वांनाच होते प्रेमचंदांनाही होते. खरी गोष्ट अशी होती की प्रेमचंदांना आधीच आपल्या कामाचा कंटाळा आलेला होता. नोकरी सोडून राष्ट्रीय चळवळीला सर्वस्वी वाहून घेण्याचे त्यांचे बेत चालू होते. आपल्याला एखादी खाजगी नोकरी मिळवून देण्यासाठी त्यांचा गेले कित्येक महिने मित्रांना आग्रह सुरू होता. ब्रिटिशांबरोबर कोणताही संबंध त्यांना आता नको होता. त्यांची ही नाराजी आता वाढत गेली आणि इंग्रजांचा प्रत्यक्ष प्रतिकार करावा, असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या गावची मंडळी सांगतात की ब्रिटिश अधिकाऱ्यांशी झगडा देण्याचा त्यांच्यावर दोनदा प्रसंग आला.

एक चकमक झडली जिल्हा न्यायाधीशाशी – गायीवरून! गाय प्रेमचंदांची आणि ती शिरली होती न्यायधीशसाहेबांच्या अंगणात. साहेब भडकले. "गायीला गोळी घालीन" म्हणून बडबडायला लागले. प्रेमचंदांनी ते ऐकले आणि तिकडे धाव घेतली. सुरुवातीला त्यांनी सौम्य भाषा वापरली, माफी सुद्धा मागितली म्हणाना. पण साहेबांचा पारा खाली येईना. तेव्हा प्रेमचंदही संतापले आणि म्हणाले, "छाती असेल तर घालाच गायीला गोळी!"

दुसरा प्रसंग खुद्द शिक्षणखात्यातल्याच एका फार वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबरचा होता. प्रेमचंदांच्या घरावरून हे गृहस्थ पुष्कळदा जात, त्यांना व्हरांड्यात बसलेले पाहत. आपल्याला पाहताच याने बाहेर येऊन आपल्याला सलाम ठोकावा, अशी या घमेंडखोर साहेबबहाद्दरांची अपेक्षा. ती प्रेमचंदांना कळली.



शिवराणी देवी

पण प्रेमचंदांनी ती पुरी केली नाही. "काहीतरीच!" ते म्हणाले. "मी काय म्हणून असं करीन? शाळा संपल्यावर माझा मी मालक आहे!"

हे सर्व त्यांना नकोसे झाले होते. यातून त्यांना बाहेर पडायचे होते. पण तसा निश्चय करणे सोपी गोष्ट नव्हती. त्यांची प्रकृती आता पूर्वीपेक्षाही खराब झाली होती. त्यातून नुकताच एक मुलगा देवींनी दगावल्यामुळे त्यांच्या मनावर औदासीन्य आले होते. काहीही पैसे शिलकीत नव्हते. भविष्यकाळ काळोखाचा नि भेडसावणारा होता. बायको आणि दोन मुले असलेला कुटुंबवत्सल माणूस नोकरीवाचून कसा राहू शकणार? असलेली नोकरी सोडण्याचा निर्णय घेणे सोपे नव्हते. त्यांनी सबंध आठवडा खूप विचार करण्यात घालवला पण अखेरीस ती एकवीस वर्षांची जुनी नोकरी अन् भावी पेन्शन यावर पाणी सोडण्याचे त्यांनी ठरवले. त्यांची पत्नी बेडर खंबीर मनाची शेतकरी स्त्री होती. तिने पतीला धीर दिला आणि त्यामुळेच मनाची डगमग थांबून ते निर्णय घेऊ शकले.

अशा रीतीने संसारपट उधळला गेला अन् नवा डाव मांडणे भाग पडले. दर खेपेस पुढल्या जेवणाची भ्रांत पडू लागली. काही दिवस प्रेमचंदानी एक खादी केंद्र चालवले. पण मग त्यांच्या लक्षात आले की हा आपला प्रांत नाही. एका स्थानिक मासिकात संपादकीय काम मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला; पण तेही मिळाले नाही. तेव्हा गोरखपूर सोडून बनारसला जायचे त्यांनी ठरविले. तिथे गेल्यावर *मर्यादा* नावाच्या हिंदी मासिकाचे ते काही महिने संपादक होते. त्यानंतर काशी विद्यापीठाच्या शाळा विभागात त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. पण तीही फार दिवस टिकली नाही आणि ते कानपूरला तिथल्या मारवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून गेले. पण ते कामही एका टर्मपुरतेच ठरले.

1923 साल उजाडले तेव्हा प्रेमचंद आपल्या खेड्यातल्या घरी शांतपणे राहण्याचे योजित होते. चार मैलांवर शहरात एक छापखाना टाकावा आणि एक लहानशी प्रकाशन संस्थाही काढावी असा त्यांचा बेत होता. 1916 साली ते गणेश शंकर विद्यार्थींच्या सहवासात आले, तेव्हापासूनच या विचाराने त्यांच्या मनाची पकड घेतली होती. विद्यार्थी हा फार थोर माणूस-हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी तो हुतात्मा बनला. या एका गोष्टीखेरीज त्यांच्याबद्दल लोकांना काही माहिती नसावी ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. स्वातंत्र्य चळवळीने वर फेकलेले ते एक रत्न होते. विलक्षण धैर्य नि सचोटी यांचा तो एक पुतळा होता. मनुष्यरूपी एक 'डायनॅमो'





मुशी प्रेमचंद—1924

होता म्हणा ना! त्याच्या सहवासात येणाऱ्या कुणालाही अंगात विद्युत्संचार झाल्यासारखा वाटे. कानपुरात विद्यार्थ्यांनी प्रताप प्रेस काढला होता. स्वातंत्र्यासाठी नि सामाजिक अन्यायाविरूद्ध चालणाऱ्या लढ्यांना वाहिलेले वाङ्मय या छापखान्यातून प्रसिद्ध होत असे. असेच काही आपणही करावे असे प्रेमचंदांना साहजिकच वाटत होते. पण असे काही करायचे म्हणजे दोन गोष्टींची अनुकूलता लागते याचा विचार प्रेमचंदांनी केला नसावा. त्या गोष्टी म्हणजे एक तर कामापुरते थोडे भांडवल आणि दुसरे धंद्याची दृष्टी - ती स्वतःची म्हणा किंवा दुसऱ्या कुणाची उसनी घेतलेली म्हणा. प्रेमचंदांजवळ यातले काहीही नव्हते. त्यामुळे छापखाना अन् प्रकाशनगृह ही दोन्ही त्यांच्या मानेवरची एक धोंड बनली. जन्मभर ती थोडीच बाळगायची होती? परिस्थिती जेव्हा अगदीच कठीण झाली तेव्हा त्यांना पुन्हा नोकरी शोधणे भाग पडले आणि या खेपेस त्यांना नागपूरच्या *माधुरी* मासिकाचे संपादकपद मिळाले. पण व्यवस्थापकांनी मदतनीस मात्र कुणीही दिला नाही. उलट दुसरी ऑफिसमधली अनेक रटाळ कामे त्यांच्यावरच ढकलली - क्रमिक पुस्तके तयार करणे, वगैरे. प्रेमचंद म्हणजे एक हरकाम्या बनला. त्यांच्याच ऑफिसमधल्या एका माणसाने विनोदाने म्हटले, "रेसच्या घोड्याला ओझ्याचं तट्टू बनवलंय!"

प्रेमचंदांना दिवसेंदिवस या कामाचा इतका वीट येऊ लागला की त्यांनी अखेरीस राजीनामा द्यायचे ठरवले. दरम्यान आपल्या बनारसच्या प्रकाशन संस्थेमार्फत त्यांनी *हंस* नावाचे मासिक सुरू केले होते. आता 1932 च्या मे मध्ये त्यांनी पुन्हा बनारसला मुक्काम हलवला. सारी स्वप्ने अपूर्ण राहिली होती आणि सहा वर्षांपूवी टाकून दिलेले धागे पुन्हा उचलणे भाग होते.

पुन्हा ये रे माझ्या मागल्या सुरू झाले. पण त्यांची त्यांना चिंता वाटली नाही. कारण ते अंगवळणी पडले होते.


राष्ट्रीय चळवळीला आता उधाण आले होते आणि कर्तव्यापुढे त्यांना कशाचीही मातब्बरी नव्हती. *हंस* म्हणजे एक डोकेदुखीच होती. पण प्रेमचंद आता *जागरण* नावाचे एक साप्ताहिकही काढणार होते - अर्थात् त्याच्या तयारीसाठी लागणारी सामुग्री जवळ नव्हतीच. लहान सहान गोष्टींत सावधपणे वागणारे प्रेमचंद, राष्ट्रीय स्वातंत्र्यासारखे उद्दिष्ट समोर आले की बेपर्वा बनत. या बेपर्वाईचे मूळ संपूर्ण समर्पणवृत्तीत होते. आयुष्यात महान कार्य करण्याचा कदाचित तोचं एक मार्ग असू शकेल! साधक-बाधक



परिणामांचा फार विचार करणारा मनुष्य अखेर खुजाच बनतो; मग तो यश केवढेही मोठे मिळवो!

छापखान्यापायी अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. कधी कधी कामगारांना द्यायला पैसे नसत. तर कधी कागदवाल्यांना नकार द्यावा लागे. एकंदरीत सारीच रडकथा होती. पण प्रेमचंद स्वतः खुषीत होते. त्यांच्या उत्साहाला भरती आलेली होती. मनोमन समाधान पावल्याचे सुख होते ते. सृजनशक्तीचे ओज अविरतपणे जे ओसंडत होते त्याच्या मुळाशी हाच आनंद होता. परिस्थिती कितीही कठीण असली तरी लेखन अखंडितपणे चालू असे. लखनौत कामाची एवढी रटरट असूनही त्यांनी कितीतरी लघुकथा, *प्रतिज्ञा* व *निर्मला* या दोन कादंबऱ्या आणि *गबन* (अफरातफर) ही भली मोठी कादंबरी हातावेगळी केली होती. लखनौला जाण्यापूर्वी तसेच छापखाना शून्यातून उभा करणे अन् तो चालू ठेवणे म्हणजे केवढी दगदग होती! तरी तशाही परिस्थितीत *रंगभूमी* (जीवन हीच रंगभूमी) आणि *कायाकल्प* या दोन प्रचंड कादंबऱ्या आणि *संग्राम* व *कबीला* ही दोन नाटके त्यांनी लिहून काढली. शिवाय् लघुकथा व इतर गद्यलेखनही पुष्कळ केले आणि आता परत बनारसमध्ये आल्यावर त्यांनी दुसऱ्या एका मोठ्या लेखनाला हात घातला. ते म्हणजे *कर्मभूमी* ही कादंबरी. तिचे क्षेत्र होते 1931-32 चे राष्ट्रीय आंदोलन. एखादा रखवालदार जसा आपल्या सभोवताली घडणारी प्रत्येक घटना डोळ्यात तेल घालून बघत असतो तशी राष्ट्रीय पटावरच्या प्रत्येक हालचालीकडे प्रेमचंदांची नजर असे. ही हेतुनिष्ठता प्रेमचंदांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होती. बनारसीदास चतुर्वेदी हे एक तेव्हापासूनचे विख्यात पत्रपंडित आणि पुढे स्वतंत्र भारतातल्या संसदेचे कित्येक वर्षे सभासद होते. या सुमारास प्रेमचंदांनी लिहिलेल्या एका पत्रात त्यांच्या मनोरचनेचे उत्कृष्ट दर्शन घडते :

> मला आयुष्यात महत्त्वाकांक्षा अशा नाहीत. या क्षणाला महत्त्वाकांक्षा एवढीच आहे की आमच्या स्वातंत्र्यसंग्रामात आम्ही विजयी व्हावं. संपत्ती किंवा कीर्ती यांची मला कधीच लालसा नव्हती. माझ्या आवश्यक गरजा भागवण्यापुरतं मला मिळू शकतं; आणि मोटार किंवा बंगला यांचं मला आकर्षण नाही. एवढं खरं की काही उत्कृष्ट दर्जाची पुस्तकं लिहावीत अशी आस मला आहे. पण अंतिम उद्दिष्ट तेच - स्वराज्यप्राप्ती. माझ्या दोन्ही मुलांच्या बाबतीतही माझ्या मोठ्याशा आकांक्षा




with this problem & those. If such members as believed in a common language. It shall have brought out a magazine in a common language in different scripts. It would have been a real service. At present its activities are communal and it has failed to justify its existence.

Certainly Hindustani is not a literary language in form and significance & grandeur. Literary language is supposed to be something apart from the spoken language. I believe in our literary expression coming as near as possible to spoken speech. At least in drama, story & novel we can write in popular language, including biography and travel, and these branches comprise three fourths of literature & that which really matters. Your science & philosophy may be written in Sanskrit or Prakrit. I don't care. As Gasonelle Lacey says 'to drag Hindi to its ancient moorings is the vain effort to turn the river's flow to its source.'

About the books I have asked my son to give you an account with whom he deposited the books. You may not be aware, my both children are at Kayastha Pathshala Intermediate School and lodging in the same building as Hindustani Academy. But they are shy extremely which they seem to have inherited from me supposing I am their father. His name is Sripat Rai. If you can send for him and ask an explanation he will tell you what became of the books.

Lekhak Sangha. Its only fruitful activity is in my opinion cooperative publication, so that every author contributing to its membership may be assured a royalty of 30 to 40%. The Hindi market is so dull and authors are so anxious to get their books published that they will come to any compromise with the publishers. If they stick to their terms & publisher refuses to publish their books, the poor fellow will be nowhere. The analogy is that

प्रेमचंदांचे इंग्रजी हस्ताक्षर



प्रेमचंदांचे हिंदी हस्ताक्षर




प्रेमचंद – 1925

नाहीत. त्यांनी प्रामाणिक असावं. सत्याने अन् निर्धाराने वागावं एवढीच माझी अपेक्षा आहे. माझे मुलगे विलासात लोळले, ऐश्वर्याच्या मागे लागले, सत्तेपुढे नाक घाशीत बसले तर ते मला मुळीच आवडणार नाही. चूपचाप बसून दिवस काढणंही मला पसंत नाही. माझ्या सारस्वतासाठी नि माझ्या देशासाठी काही तरी करीत राहावं असं मला वाटतं. गरजा म्हणाल तर साधा वरणभात अन् वर थोडंसं तूप आणि अंगावर घालायला कमीत कमी अन् साध्यात साधे कपडे एवढीच माझी मागणी आहे.

यानंतर तीन वर्षांनी जपानी कवी योने नोगुची यांच्या भेटीसाठी बनारसीदासनी कलकत्त्याला बोलावले असता प्रेमचंदांनी त्यांना नकार दिला. त्या वेळचे त्यांचे पत्र त्यांच्या अंतःस्थ मनोगतावर प्रकाश टाकणारे आहे :

जगात विशाल मनाचे कितीतरी लोक आहेत. पण त्यांच्यातले खऱ्या अर्थाने थोर कोण अन् खोटे कोण हे ओळखायला तारतम्यबुद्धी तितकी सूक्ष्म हवी. महापुरुषाने श्रीमंतीत लोळत राहावं ही कल्पनाच मला सहन होत नाही. एखादा माणूस श्रीमंत आहे असं दिसलं की त्याची कलेबद्दलची नि ज्ञानाबद्दलची सारी भाषणबाजी मला फोल वाटू लागते. श्रीमंतांनी गरिबांची पिळवणूक करणं यावर आजची समाजरचना आधारलेली आहे. तिच्यापुढे लोटांगण घालणारा माणूस अशा स्वरूपात मी त्याला पाहतो. माझी मनोवृत्ती अशी बनली याला मी जीवनात खाल्लेली हार कदाचित कारण असेल. बँकेत लठ्ठ शिल्लक असती तर कदाचित मी इतरांसारखा झालो असतो - संपत्तीच्या मोहाला बळी पडणारा, पण मी माझं हे सुदैव समजतो की निसर्गाने अन् नियतीने मला मदत केली अन् गरिबांच्या गोतावळ्यात मला स्थान दिलं. त्यामुळे मला आध्यात्मिक शांती लाभली.

ही आध्यात्मिक शांती त्यांना भरपूर प्रमाणात मिळाली. आपल्या *कर्मभूमी* या कादंबरीचे आणि नंतर *गोदान*चे लेखन त्यांनी धीरे-धीरे चालू ठेवले होते. शिवाय अनेक लघुकथा नित्य बाहेर पडत होत्याच. याखेरीज त्यांची दोन मासिके होती आणि त्यातून



प्रेमचंदांनी बांधलेले घर

ब्रिटिश राजवटीवर अविरत हल्ले होत होते. हे साधे किरकोळ सुख नव्हते. परमसौख्य होते.

आणि तरी अर्थशास्त्राचे काही नियम आहेत. तुम्हाला स्वतःला वाटणारे सुख किंवा आध्यात्मिक समाधान यांच्याशी त्यांना काही कर्तव्य नसते. त्यांचा संबंध असतो फक्त पुंजीशी. आणि प्रेमचंदांजवळ पुंजी होती किती? तिकडे दोन्ही मासिकांना डोईभर कर्ज झालेले होते- कर्जदारांची सांपत्तिक क्षमता पाहता त्या रकमा प्रचंडच होत्या. अशावेळी मुंबईच्या अजन्ता सिनेटोनचे मोहन भवनानी यांच्याकडून त्यांना मागणी आली. फिल्मी दुनियेत जायला प्रेमचंद जरा बिचकतच होते. पण त्या क्षणी त्यांना दुसरा मार्ग नव्हता. सावकार दाराशी उभे होते. पैसा मिळवायला हवा होता. त्यामुळे स्वतःची इच्छा नसतानाही त्यांनी भवनानींबरोबर एक वर्षाच्या करारावर सही केली. पण प्रेमचंदांना वाटले होते तसेच झाले. आपण या सृष्टीतले नव्हेत असा त्यांना अनुभव आला. कादंबरीकार जैनेंद्रकुमारांना त्यांनी लिहिले :

> ... इथे येण्यामागचा माझा कोणताही हेतू सफल होतो आहे असं दिसत नाही. निर्मात्यांना ज्या प्रकारच्या कथा हाताळण्याची नित्याची सवय त्यापासून यत्किंचित ढळण्याची त्यांची तयारी नाही. त्यांच्या दृष्टीने पांचटपणा म्हणजे करमणूक.

हैदराबादचे श्री. घोरी यांना लिहिलेल्या पत्रात प्रेमचंद म्हणतात :

> चित्रपटांचं भवितव्य ज्यांच्या हाती आहे ते त्याच्याकडे धंदा म्हणून बघतात. धंद्याचा अभिरुचीशी किंवा ती सुधारण्याशी संबंधच काय? धंद्याला फक्त राबवून घेणं माहीत असतं. आणि इथे तर माणसाच्या सर्वांत पवित्र भावना राबवल्या जात आहेत!

झाले एवढे बस्स झाले, असे वाटून प्रेमचंदांनी वर्ष पुरे होण्याच्या आतच गाशा गुंडाळला. "निदान आणखी एक वर्ष तरी राहा," म्हणून भवनानींनी आग्रह केला. पण प्रेमचंदांचा निर्धार झाला होता. त्यांना आता मनापासून असे वाटत होते की आपण ज्या मातीत वाढलो तिकडेच परत जाणे बरे. याच सुमारास हिमांशू राय



नुकते इंग्लंडहून परतले होते. ते मध्ये पडले आणि त्यांनी प्रेमचंदांना करारावर सही करण्याची गळ घातली. पण त्यांनी नम्र शब्दांत ठाम नकार दिला. चित्रपटांचा मायाबाजार सोडून त्यांना आपल्या गावी परत जायचे होते. जैनेंद्रकुमारांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात :

> माझ्या कादंबरीची (*गोदान*) शेवटची पानं मला लिहायची आहेत. पण ते काम मला इथे जमत नाही. माझी एकमेव इच्छा मुंबईचा निरोप घेऊन माझ्या गावी जाण्याची आहे. तिथे पैसा नसेल पण समाधान निश्चित आहे. इथे मला सारखं वाटत असतं की मी आयुष्य फुकट घालवतो आहे.


# सहा

आणि 4 एप्रिल 1935 रोजी त्यांनी मुंबईला रामराम ठोकला.


दहा महिने मुंबईत घालवून प्रेमचंद प्रकृतीने पुरे खंगले होते. बनारसला आले ते रुग्ण बनूनच. यकृत किंवा लिव्हर फुटायला आली होती. *गोदान* ही कादंबरी, जी पुढे त्यांचा ग्रंथशिरोमणी ठरली आणि जिच्यामुळे त्यांना जागतिक कीर्ती मिळाली, ती अजून पूर्ण झालेली नव्हती. तो भार मनावर होताच. (आता *गोदान* कादंबरी *दि गिफ्ट ऑफ दि काऊ* नावाने संयुक्त राष्ट्रांच्या 'युनेस्को' या सामाजिक व सांस्कृतिक संघटनेमार्फत एशियन वाङ्मय मालेत इंग्रजीतून प्रसिद्ध झाली आहे.) प्रामाणिक आणि देवभिरू शेतकऱ्याच्या हालअपेष्टांची व मृत्यूची ही कथा असून ग्रामीण भागात श्रीमंतांकडून गरिबांची जी पिळवणूक होत असते तिचे उघडे नागडे चित्र त्यात आहे. पुस्तक वाचल्यावर कुणालाही असे वाटावे की या लेखकाच्या मनात गरिबांविषयी अपार करुणा तर आहेच, पण त्याचबरोबर त्यांना छळणाऱ्या गावगुंडांविषयी तशीच पण मुग्ध क्रोधाची भावना आहे. अनेक दुर्धर अडचणींना तोंड देत प्रेमचंदांनी अखेरीस 1937 च्या सुरुवातीला ती पूर्ण केली आणि आपल्या पद्धतीप्रमाणे लगेच *मंगल सूत्र* नावाची नवी कादंबरी सुरू केली. हिचा नायक एक दरिद्री पण नामवंत लेखक असतो. म्हणजे तिला आत्मचरित्राची झाक आहे हे उघडच आहे. पण पुढे तिला कसा आकार आला असता हे सांगणे कठीण आहे; कारण लेखक ती पूर्ण करीपर्यंत जगलाच नाही.

1935 साली केव्हातरी इंग्लंडमधल्या काही तरुण भारतीय लेखकांनी — यात मुल्कराज आनंद आणि सज्ञाद जहीर होते - 'इंडियन प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन्' (भारतीय प्रागतिक लेखक संघ) नावाची एक संघटना स्थापना केली होती. आता 1936 च्या एप्रिलमध्ये लखनौत ते आपली पहिली परिषद भरवणार होते. प्रेमचंद त्यांना अध्यक्ष म्हणून हवे होते. प्रेमचंदांनी ते निमंत्रण आनंदाने स्वीकारले; कारण या संघटनेमागचे हेतू, इंग्लंडमधून संस्थेबद्दलचा वृत्तांत आला, तेव्हाच त्यांना माहीत झाले असून आपल्या मासिकांतून त्यांनी तिचे स्वागत केले होते. परिषदेपुढे त्यांनी जे स्फूर्तीदायक भाषण केले त्यामुळे या चळवळीला आणखी कितीतरी वर्षे आधार देणारा पाया तयार झाला. लोकांच्या सामाजिक व नैतिक कल्याणाला वाहिलेले वाङ्मय हा प्रेमचंदांचा जीवनभराचा आदर्श होता. त्यामुळे ही परंपरा जिवंत ठेवणारी नवलेखकांची एक प्रभावळ तयार होत आहे हे पाहून त्यांना साहजिकच संतोष वाटला.

दुसरा एक मोठा प्रश्न त्यांना या काळात सतावत होता. तो म्हणजे भाषेचा. उर्दू आणि हिंदी या दोन भाषांनी दोन विभक्त व सक्त असे गट करून राहणे हे दोघांनाही आत्मघातकी पणाचे आहे, अशी त्यांची खात्री पटली होती. दोन्ही भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळवले असल्याने त्यांना एक भोळी आशा वाटायची की हिंदी-उर्दूंना साधणारा पूल म्हणून आपला उपयोग होऊ शकेल आणि कधी ना कधी दूरच्या भविष्यात का होईना- दोन्ही भाषांचे मिलन होऊ शकेल. या कल्पनेने त्यांच्या मनावर इतका पगडा बसवला होता की आपल्या आयुष्यातली अखेरची कामगिरी अशा दृष्टीने ते तिकडे पाहत होते.



प्रेमचंदांच्या वस्तू



प्रेमचंदांची पेटी आणि चष्मा


ही कल्पना उराशी बाळगून प्रेमचंदांनी साऱ्या देशभर धावाधाव चालवली होती - लखनौहून लाहोर, लाहोरहून नागपूर. हिंदुस्तानी हे एक भाषेचे सर्वसामान्य माध्यम व्हावे, यासाठी गांधीजींच्या अध्यक्षतेखाली नागपुरात एक सभा भरायची होती, म्हणून तिथे. पण लवकरच प्रेमचंदांना स्पष्ट दिसून आले की आपले स्वप्न वास्तवात येणे शक्य नाही; आपण मृगजळामागे धावतो आहे. दोन्ही बाजूंना जे शुद्धिमार्तंड होते त्यांनी त्या स्वप्नांचा चुराडा केला होता. साहजिकच प्रेमचंदांना फार दुःख झाले.

असेच पण दुसऱ्या प्रकारचे एक दुःखही त्यांच्या वाट्याला यायचे होते. त्यांनी जन्मभर जतन केलेला एक आदर्श धुळीला मिळायचा होता. त्यात गेल्या वीसएक वर्षांत काही बारीक सारीक फेरफार केले असले तरी त्या आदर्शाच्या गाभ्याला ते चिकटून होते. पण आता- आयुष्याच्या अखेरच्या काळात – त्यांना कळून चुकले की धनिक वर्गाचे हृदयपरिवर्तन होऊन तो हातातले धन सोडील अशी आशा बाळगणे म्हणजे चित्ता आपले ठिपके बदलील असे म्हणण्यासारखे आहे! हा पराभव मान्य करताना त्यांना किती दुःख झाले असेल याची कल्पना त्यांच्या *मंगलसूत्र* या अखेरच्या व अपूर्ण कादंबरीतल्या पुढील उताऱ्यावरून येते:



होय, देवदूत होते आणि पुढेही नित्य असतील. त्यांना अजूनही असे वाटते की जग धर्म व नीतिशास्त्र यांना अनुसरून वाटचाल करते आहे. ते स्वतः हुतात्मे बनतात आणि जग सोडून जातात. पण त्यांना देवदूत का म्हणायचं? आपण त्यांना भित्रेच म्हणूया ना - स्वतःमध्ये मशगुल झालेले भागूभाई! जो न्यायाचा कैवार घेतो अन् त्यासाठी आपला जीव कुरबान करतो तो खरा देवदूत. जो स्वतःला कळत असूनही कळत नसल्याचा आव आणतो तो तर नीतिदृष्ट्या खचला असेच मी म्हणेन. पण सध्याची दुष्ट समाजरचना ज्याच्या मनाला नुसती खुपत देखील नाही तो आंधळा नि मूर्ख म्हटला पाहिजे. तो देवदूत नव्हेच. शिवाय देवदूतांना इथे जागाही नाही. याच देवदूतांनी नशिबाच्या, देवाच्या नि देवभक्तीच्या कल्पित कथा पसरवून ही अनैतिक रचना टिकवून ठेवली आहे. (त्यांनी असे केले नसते तर) या भाकडकथांचा मनुष्याने केव्हाच खातमा केला असता किंवा असला समाजच खलास करून टाकला असता. आणि हे सध्याचेच चालत राहण्यापेक्षा ते कितीतरी चांगले झाले असते. छे, आपण माणूस म्हणूनच जगायला हवं. श्वापदांचे भक्ष्य होऊन राहण्यापेक्षा आपण शस्त्रसज्ज व्हावयास हवे. श्वापदांना जर आपण आपले तुकडे करू दिले तर आत्मघातकी, मूर्खपणाचे ठरेल, उच्च दैविक नव्हे.

1936 चा उन्हाळा. 'हिंदुस्तानी'च्या आपल्या प्रचारमोहिमेवरून प्रेमचंद परतले आहेत. खूप थकलेले, पण विश्रांती माहीत नाही. पूर्वीसारखेच मध्यरात्री केव्हातरी उठतात आणि मांडी ठोकून लिहायला बसतात, जसा काही अंगात निर्मितीचा ज्वर चढला आहे! किंवा आपल्या मुशाफरीचा शेवट जवळ आला आहे, अशी त्यांना कदाचित चाहूल लागली असेल आणि म्हणून जे सांगायचे आहे ते – कष्टमय जीवनातल्या अनुभवांची जी गोळाबेरीज आहे ती सारी – जोवर वेळ आहे तोवर सांगून टाकण्याची त्यांना घाई लागली असेल. कादंबरीचे लेखन तर चालू आहेच, पण शिवाय *कफन* (प्रेतावरची चादर) ही त्यांच्या अनेक महान् कथांमध्ये महान ठरावी अशी कथाही त्यांच्या लेखणीतून याचवेळी उतरली आहे. जीवनभर राशीला लागलेली क्षुधा व यातना यामुळे मानवाचे अमानवीकरण कसे होते ते या कथेत दाखवले आहे. याच्याच जोडीला *महाजनी सभ्यता* (भांडवलशाही संस्कृती) हा त्यांचा कडवट निबंधही याच काळातला. त्यात भांडवलशाहीचा धिक्कार करून त्यांनी समाजवाद उचलून धरला आहे. यात भर त्या अपूर्ण कादंबरीची. या तीन





शेवटचा आजार

साहित्यकृती म्हणजे ज्या जनसामान्यांवर त्यांनी नितांत प्रेम केले त्यांना वाहिलेले त्यांचे अखेरचे मृत्युपत्रच म्हणायला हरकत नाही.

हे एवढे झाले. आणखी सांगायची ताकद त्यांच्या दुर्बल बनलेल्या शरीरात नव्हती. ते आजारी पडले. 25 जून 1936 रोजी रक्ताची मोठी वांती झाली. डॉक्टरांच्या मते आतड्याचे अल्सर – गळू. अनेक डॉक्टर बोलवून झाले. वैद्यकीय उपचार नाना प्रकारांनी करण्यात आले. पण कशाचाही उपयोग झाला नाही. आतड्याचे अल्सर म्हणून ज्याचे निदान करण्यात आले होते तो जलोदर बनला आणि मग यकृतदाह. ही वैद्यकीय परिभाषा घरात कुणालाच कळत नव्हती. पण प्रेमचंदांच्या शरीराला तीव्र यातना होत होत्या एवढे स्पष्ट होते. आपण मरणाच्या दारात आहोत हेही त्यांना कळून चुकले होते. पण त्यामुळे त्यांच्या मनाला मात्र त्रास होत नव्हता. त्यांचा अंतरात्मा शांत होता; आणि त्यामुळे त्यांना देवाची किंवा देवांच्या दलालाची गरज वाटत नव्हती. आयुष्याचा क्षण न् क्षण आपण निर्माण क्रियेत घालविला, सार्थकी लावला, यापेक्षा आणखी अधिक कुणाला काय हवं असतं? निरोप घेण्याची वेळ आली आहे. निकटवर्तीयांना चुकल्यासारखे वाटेल; पण आपण गेलो तरी जीवनसरिता थांबणार नाही, ती वाहतच राहील.

देहाचा अस्थिपंजर झाला होता, गाल खोल गेले होते. वेदना कमी होत नव्हत्या. पण वृत्ती शांत होती. नेहमीची प्रसन्नता ढळली नव्हती. यामुळे अंत जेव्हा आला - 8 ऑक्टोबर 1936 - तेव्हा सर्वांनाच धक्का बसल्यासारखे झाले. अंत्ययात्रेला जेमतेम एक डझन माणसे - गावातलेच मित्र अन् नातेवाईक. सुरुवात साधी झाली होती. शेवटही साधा झाला.



Printed by : Personal Graphics & Advertiser Pvt. Ltd., New Delhi